महत्त्वाचे

मोदी, शहांनी बंगलादेशचे दोन तुकडे करावेत- झावरे

कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)– तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानची फाळणी करून बांगलादेश निर्माण केला. ते उपकार बांगलादेशवासी विसरले आहेत. तेथील हिंदूंवर अमानुष अत्याचार सुरू आहेत. आता पुन्हा एकदा धाडसी निर्णय घेऊन बांगलादेशची फाळणी करून दोन तुकडे करावेत व एक भूभाग केवळ हिंदूंसाठीच ठेवावा, अशी मागणी उद्धवसेनेचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख राजेंद्र झावरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली आहे. बांगलादेशात हिंदूंवर अमानुष अत्याचार सुरू आहेत. मारहाण व जाळपोळीत अबालवृद्ध भरडले जात आहेत. शेकडो मंदिरे जमिनदोस्त करण्यात आली आहेत. हिंदू धर्मगुरूंना लक्ष्य केले गेले आहे. त्यांचे वकीलपत्र घेणाऱ्या वकीलांनाही मारहाण झाली असून तेथील हिंदू वकिलांची सनद रद्द करण्याची मागणी देखील बांगलादेशात होत आहे. बांगलादेशातून हिंदूंना बाहेर काढण्याचे षडयंत्र सुरू आहे. बांगलादेशातील शासनाला जर दुसऱ्या धार्मियांना तेथे राहू द्यायचे नसेल तर त्यांचे हे मनसुबे भारताच्या कणखर नेत्यांनी उधळून लावावेत व हिंदूंवरील अत्याचार रोखावेत, तिथेच त्यांना सन्मानजनक वागणूक मिळेल यासाठी प्रयत्न करावेत. पाकिस्तान पासून बांगलादेश वेगळा करण्याचे धाडसी पाऊल स्व. इंदिरा गांधी यांनी उचलले होते. आताही पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह तसेच परराष्ट्रमंत्री सुब्रह्मण्यम जयशंकर यांनी तशीच कठोर भूमिका घ्यावी. बांगलादेशाची फाळणी घडवून आणावी. हिंदूंसाठी स्वतंत्र भूभाग निर्माण करावा, अशी मागणी राजेंद्र झावरे यांनी केली आहे. उत्तर प्रदेशातील संभल येथे हिंसाचारामधील पीडितांना भेटण्याचा आग्रह राहुल गांधी धरत आहेत. राहुल गांधी यांनी संभलला जाण्यापेक्षा बांगलादेशात जाऊन तेथील पीडितांना भेट द्यावी, असेही राजेंद्र झावरे यांचे म्हणणे आहे.

जागतिक मृदा दिनानिमित्त रामपूरवाडीत शेतीशाळा

राहाता (प्रतिनिधी)– जागतिक मृदा दिनानिमित्त रामपूरवाडी येथे शेतकरी संवाद व शेतीशाळा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर येथील शास्त्रज्ञ श्री. घुले यांनी कांदा पीक बीजप्रक्रिया, रोपवाटिका तयार करणे, एकात्मिक तण व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग नियंत्रण, कांदा पिकात बुरशीनाशक व कीटकनाशके फवारणी करताना घ्यावी लागणारी खबरदारी, पाण्याचा सामू, फवारणी कालावधी याबद्दल मार्गदर्शन केले. शेतकरी बांधवांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. कांदा उत्पादन वाढीतील मृदा आरोग्यासाठी करावयाच्या उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ॲडव्हान्स पेस्टीसाईडचे पवन भालके यांनी हरभरा पिकांचे उत्पादन तंत्रज्ञान, एकात्मिक कीड व रोग नियंत्रण तसेच जमिनीचे आरोग्य योग्य राहण्याकरिता सेंद्रिय कर्बाचे महत्त्व, नॅनो खतांचा वापर व उपयोगिता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी अशोक उगले, शिवाजी आंबडकर, शिवाजी जगताप, रामदास शिंदे, सुनील साबदे, संदेश धनवटे, कैलास नरोटे, पांडुरंग वडणे व इतर शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. आभार वाल्मिक जगताप यांनी मानले.

साई निर्माण स्कुलच्या विद्यार्थ्यांनी घेतला अंतराळचा अनुभव

शिर्डी (प्रतिनिधी)– येथील साई निर्माण इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अंतराळ बाबतचा तसेच तेथील वातावरणाचा अनुभव घेण्याचा आनंद घेतला. साई निर्माण स्कूलमध्ये शिक्षणाबरोबर खेळात, सामाजिक कार्यात, आध्यात्मिक क्षेत्रासह विज्ञान युगात देखील आपल्या संस्थेचा विद्यार्थी कुठेही मागे राहू नये यासाठी नवनवीन उपक्रम संस्थेच्यावतीने राबविण्यात येतात. बुधवारी देशाचा स्वाभिमान व अभिमान असलेली तसेच भारताचा डंका जगभरात गाजविणारी संस्था म्हणून ओळखली जाणारी भारत सरकारची इस्रो संस्थेच्यावतीने एक सुसज्ज बस साई निर्माण स्कूलच्या प्रांगणात दाखल झाली. स्पेस ऑन व्हील्स अशी टॅगलाईन असलेल्या बसमध्ये आजवर इस्रो संस्थेच्यावतीने अंतराळात राबविल्या गेल्या मोहिमांच्या हुबेहूब प्रतिकृती आणि त्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. बसमध्ये गेल्यानंतर अक्षरशः अवकाशात किंवा अंतराळात गेल्याचा भास होत असल्याचे विद्यार्थ्यांना जाणवले. इस्रो संस्था, अवकाश भारती पुणे व साई निर्माण इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला या उपक्रमात साई निर्माण स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्वतः शास्त्रज्ञ बनून इंग्रजी भाषेत आलेल्या मान्यवरांना आणि शाळेतील महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनींना इस्रोच्या विविध जगप्रसिद्ध मोहिमा आणि त्यासाठी देशाच्या शास्त्रज्ञांनी केलेले कष्ट यांसह या प्रतिकृतीबाबत विस्तृत माहिती देत त्यांच्या ज्ञानात भर पाडली. यावेळी स्कूलचे उपाध्यक्ष ताराचंद कोते, ग्रीन अँड क्लीन शिर्डीचे अध्यक्ष अजित पारख, सामाजिक कार्यकर्ते मनिलाल पटेल, स्कूलचे मुख्याध्यापक गणेश डांगे तसेच शिक्षक यांच्याहस्ते बसचे पूजन करत आरती करून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी आलेले मान्यवर, शिक्षक, सर्व कर्मचारी यांनी देशातील शास्त्रज्ञांच्यावतीने राबविण्यात आलेल्या जगप्रसिद्ध मोहिमांतील विविध प्रतिकृती प्रत्यक्षात पाहत त्याच्याबाबत माहिती करून घेतली.

जागतिक मृद आरोग्य दिनानिमित्त

देवगाव येथे श्रमदानातून वनराई बंधारा

नेवासा (तालुका प्रतिनिधी)– जागतिक मृद आरोग्य दिनानिमित्त तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे व मंडल कृषी अधिकारी रामदास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पाणलोट विकास संकल्पनेतून तालुक्यातील देवगाव येथे श्रमदानातून वनराई बंधारा तयार करण्यात आला.

देवगावचे कृषी सहाय्यक अमोल साळवे व देडगावचे कृषी सहाय्यक गोरक्षनाथ काळे, प्रगतिशील शेतकरी हरिभाऊ आगळे यांच्या सहकार्याने व शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत जागतिक मृद आरोग्य दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांना मृदू आरोग्याबाबत माहिती देण्यात आली. तसेच पाणलोट विकास संकल्पनेतून आगळे वस्ती ओढ्यावर श्रमदानातून वनराई बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले. प्रसंगी हरिभाऊ आगळे, सागर आगळे, अमोल पांगळे, महेश पोकळे, बाबानाथ आगळे, गणेश शिंदे, सागर जामदार, हरिभाऊ गोठणे, श्री.देवकाते, गोरक्ष देवकाते हे शेतकरी यावेळी उपस्थित होते.

योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशीप स्पर्धेत ध्रुवचे यश

महाराष्ट्र संघाचे नेतृत्त्व; चॅम्पियनशीपचा किताबही पटकावला

संगमनेर (प्रतिनिधी)– गुवाहाटी येथे पार पडलेल्या पाचव्या सबज्युनिअर आणि ज्युनिअर योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशीप स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्त्व करणाऱ्या ध्रुव ग्लोबल स्कूलने दहा सुवर्णपदकांसह सर्वसाधारण चॅम्पियनशीपचा किताबही पटकावला. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या रोहन तायडे व रुद्राक्षी भावे यांना वैयक्तिक चॅम्पियनशीप देवून त्यांचा विशेष सन्मानही करण्यात आला.

सबज्युनिअर गटात ध्रुवच्या रोहन तायडे याने सुवर्णपदक मिळवताना महाराष्ट्र संघाचे खाते उघडले. या गटात अंश मयेकरला पाचवे स्थान मिळाले. तर, ज्युनिअर गटात प्रणव साहू व रुद्राक्षी भावे यांनी सुवर्ण आणि प्रांजल व्हन्नाने कांस्यपदक पटकावले. सबज्युनिअर गटातील तालात्मक दुहेरी प्रकारातही अंश मयेकर व रोहन तायडे आणि तृप्ती डोंगरे व देवांशी वाकळे यांच्या जोडीने तर ज्युनिअर गटात आर्यन खरात व प्रणव साहू आणि प्रांजल व्हन्ना व रुद्राक्षी भावे यांनी सुवर्णपदके पटकावली. कलात्मक दुहेरी प्रकारात अंश मयेकर व रोहन तायडे आणि ज्युनिअर गटात प्रणव साहू व यश लगड यांनी रौप्यपदकांची कमाई केली.

पारंपरिक योगासनांच्या ज्युनिअर गटात स्वरा गुजरने कांस्यपदक तर कलात्मक सोलो प्रकारात तृप्ती डोंगरेने सुवर्णपदक मिळवले. आपल्या यशाची पताका फडकावत ठेवताना महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करणाऱ्या ध्रुव ग्लोबल स्कूलच्या योगासनपटूंनी सांघिक प्रकारातही घवघवीत यश मिळवले. सबज्युनिअर गटातील कलात्मक प्रकारात अंश मयेकर, रोहन तायडे यांनी सुवर्ण, तृप्ती डोंगरे, वैदेही मयेकर आणि रिद्धी लगड यांनी कांस्यपदक मिळवले. तर ज्युनिअर गटात यश लगड, आर्यन खरात व प्रणव साहू यांनी सुवर्ण आणि रुद्राक्षी भावे व प्रांजल व्हन्ना यांना रौप्यपदक मिळाले. या संपूर्ण स्पर्धेत सर्वोत्कृष्ट प्रदर्शनाच्या जोरावर रोहन तायडे व रुद्राक्षी भावे यांनी वैयक्तिक चॅम्पियनशीपचा तर महाराष्ट्राचे नेतृत्त्व करणाऱ्या ध्रुव ग्लोबल स्कूलला सर्वसाधारण चॅम्पियनशीपचा किताब देवून सन्मानित करण्यात आले. योग प्रशिक्षक विष्णू चक्रवर्ती, प्रवीण पाटील व काजल ताजणे यांनी ध्रुवच्या योगासनपटूंना मार्गदर्शन केले. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी, उपाध्यक्ष गिरीश मालपाणी व प्राचार्या अर्चना घोरपडे यांनी अभिनंदन केले.

प्रवरा पब्लिक स्कूलच्या वार्षिक क्रीडा महोत्सवास प्रारंभ

राहाता (प्रतिनिधी)– प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा पब्लिक स्कूलच्या ५९ व्या आंतरसदनीय वार्षिक क्रीडा महोत्सवास जल्लोषात सुरुवात झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी दिली.

क्रिडा महोत्सवाची सुरुवात लोणी पोलिस स्टेशनचे कैलास वाघ, अशिष चौधरी यांच्या हस्ते क्रीडाध्वज फडकवून आणि क्रीडा ज्योत प्रज्वलित करून झाली. चारही सदनांच्या खेळाडूंनी शिस्तबद्ध संचलन करून क्रीडा ध्वजास मानवंदना दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी लाठी काठीचे प्रात्यक्षिक सादर केले. श्री. वाघ यांनी शाळेतील सर्व उपक्रमांचे आणि शिस्तबद्ध वातावरणाचे कौतुक करत क्रीडा क्षेत्रातील संधी आणि स्पर्धा परीक्षा यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

क्रीडा महोत्सवाची सुरुवात १०० मीटर, ४०० मीटर शर्यतींनी झाली.तसेच प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांची अडथळा शर्यत विशेष लक्षवेधक ठरली. विजेत्या स्पर्धकांना पदके व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हा क्रीडा महोत्सव सरदार पटेल सदन, शिवाजी सदन, नेताजी सदन आणि तानाजी सदन या सदनांमध्ये आयोजित केलेला आहे. क्रीडा महोत्सवात उंच उडी, लांब उडी, तिहेरी उडी, भालाफेक, गोळा फेक, थाळी फेक, १००, २०० आणि ४०० मीटर धावण्याच्या शर्यती, १५०० मीटर लांब पल्ल्याच्या शर्यती, ४०० मीटरच्या रिले शर्यती, ४०० मीटर अडथळा शर्यती तसेच प्राथमिक विभागाचे विविध मनोरंजनात्मक खेळ इत्यादी प्रकारांचा समावेश केलेला आहे. सर्व क्रीडा स्पर्धकांसाठी व क्रीडा रसिकांसाठी ही एक अनोखी मेजवानी ठरणार आहे. प्राचार्य डॉ. बी बी अंबाडे, उपप्राचार्य के. टी अडसूळ, पर्यवेक्षिका एम. एस. जगधने, शुभांगी रत्नपारखी यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा संचालक रमेश दळे, डी. के. जाधव, यांनी स्पर्धा नियोजनात परिश्रम घेतले.

नगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतली व्यावसायिकाची मुलाखत

कोपरगाव (प्रतिनिधी)– व्यवसायिकांची मुलाखत हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम नगरपालिका शाळा क्र. ६ येथील इयत्ता पाचवीच्या वर्गासाठी सुरु केला आहे.

विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिकांची माहिती व्हावी, देशाचा अभ्यास करताना सर्वप्रथम आपले गाव विद्यार्थ्यांना माहिती व्हावे हा दृष्टिकोन समोर ठेऊन हा उपक्रम सुरु केला आहे. शहरातील ब्युटी पार्लरला विद्यार्थ्यांसह भेट देण्यात आली. यावेळी पार्लरच्या चालकांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ब्युटी पार्लर दाखवले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे दिली. नगरपालिका शाळा क्रमांक सहा ही फक्त मुलांची शाळा आहे. तरी देखील त्यांना आज प्रत्यक्ष लेडीज ब्युटी पार्लर मध्ये नेऊन तेथील काम कसे चालते हे दाखवण्यात आले. यावेळी योगीता जाधव यांनी मुलांना समजेल अशा भाषेत समर्पक उत्तरे दिली.

अमन शेख, अजिम शेख, शुभम कांबळे, पवन कुंढारे, आहिल परमार यांनी प्रश्न विचारले. यश वाकचौरे, आरव तुपसुंदर, युवराज माळी, लोकेश शेलार, अर्णव मोहिते, यश वाघरी, ईशान पगारे, साई गायकवाड, आर्यन डुकरे, आयुष पुडे यांनी सहभाग घेतला. या उपक्रमासाठी शिक्षिका सुनीता इंगळे, अनुराधा सोमासे यांची साथ लाभली. प्रभारी मुख्याध्यापक माणिक कदम यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सविता साळुंके, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा अर्चना वाहुळकर यांनी कौतुक केले आहे.

आरडगावच्या उपसरपंचपदी निलेश जगधने

आरडगाव (वार्ताहर)– राहुरी तालुक्यातील आरडगावच्या उपसरपंचपदी निलेश मच्छिंद्र जगधने यांची निवड करण्यात आली आहे.

सरपंच सुरेखा म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली निवड बैठक पार पडली. जगधने यांच्या नावाची सूचना पल्लवी काळे यांनी मांडली. त्यास सर्वांनी अनुमोदन दिले. त्यामुळे सदर निवड बिनविरोध झाल्याचे ग्रामविकास अधिकारी किसन भिंगारदे यांनी जाहीर केले.

यावेळी शिवाजी वने, गोविंद म्हसे, रवींद्र म्हसे, दत्तात्रय काळे, केशव म्हसे, अशोक काळे, प्रमोद झुगे, बापूसाहेब धसाळ, सोपान झुगे, राजेंद्र जाधव, राजेंद्र झुगे, नितीन काळे, चंद्रकांत म्हसे, सागर देशमुख, मच्छिंद्र जगधने, लक्ष्मण निकम, दिलीप म्हसे, अण्णासाहेब भांड, सतीश धसाळ, अमोल म्हसे, किशोर गागरे, दत्तात्रय म्हसे, सचिन झुगे, रवींद्र गायकवाड, संदीप जेऊघाले, प्रकाश भांड, सचिन झुगे, सारिका जाधव, आदींसह डॉ.सचिन खुरुद, उत्तम वने, सुरेद्र जाधव, संगीता तांबे, मंदा म्हसे, लिलाबाई झुगे, आशा जाधव, स्वाती गागरे, पल्लवी काळे, मनीषा जाधव आदी सदस्य उपस्थित होते. नवनिर्वाचित उपसरपंच जगधने यांचा सत्कार करण्यात आला.

धोकादायक वळणावर गतिरोधक बसवा

पढेगाव-मालुंजा रस्त्यावरील वाहनधारकांची मागणी

▸ साधारण रस्त्याचे पक्के डांबरीकरण झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नेहमी अपघात होतात किंवा वेडी-वाकडी वळणे, पूल अशा अपघातग्रस्त ठिकाणी दिशादर्शन फलक लावले जातात. जेणेकरून वाहनधारकाला रस्त्याला अंदाज येतो. परंतु, या रस्त्यावरील धोकादायक वळणावर मात्र, संबंधित विभागाने फलक लावला नसल्याने नवीन वाहनधारकाला या वळणावर अंदाज येत नसल्याने अपघात होत आहेत.

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– तालुक्यातील पढेगाव- मालुंजा रस्त्यावरील मुंजाळ वस्तीनजीक असलेले धोकादायक वळण अपघातस्थळ बनले असल्याने येथे तातडीने गतिरोधक बसवावे, अशी मागणी वाहनधारक व नागरिकांनी केली आहे.

श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातील वाहनधारक नागरिकांसाठी तालुक्याला जोडणारा हा महत्वपूर्ण मार्ग असल्याने या रस्त्यावर वाहनांची वर्दळ असते. पढेगाव ते मालुंजा दरम्यान रस्त्याचे डांबरीकरणाचे काम चांगले झाले असल्याने या रस्त्यावर वाहने सुसाट सुटतात. यामुळे वाहनधारकांची नक्कीच सुविधा झालेली आहे. त्यामुळे वाहनधारकांचा वेळ व पैसा वाचला.

मात्र, या रस्त्यावरील मालुंजाकडे जाताना गुंजाळ वस्तीनजीक धोकादायक वळण निर्माण झाले आहे. या वळणावर दुचाकी, चारचाकी वाहन सुसाट सुटत आहे. त्यामुळे वाहनाचा वेग नियंत्रणात राहत नसल्याने या वळणावर छोटे-मोठे अपघात नित्याचेच झाले आहेत. आतापर्यंत या वळणावर अनेक अपघात झाले असल्याचे वाहनधारक सांगतात. भविष्यात भीषण अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वळणावर मोठी झाडे-झुडूपेही वाढली असल्याने समोरून येणारे वाहन दिसत नसल्याने चालक गोंधळून जावून अपघात होत आहेत.

त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या धोकादायक बनलेल्या वळणावर वाहनांचा वेग नियंत्रीत करण्यासाठी व संभाव्य अपघात टाळण्यासाठी वळणावर दोन्ही बाजुने गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी तालुका काँग्रेस कमिटीचे अनिल लबडे, जगन्नाथ मुंजाळ, नानासाहेब मुंजाळ, बबनराव जगताप, अनिल बोरोवके, दत्तात्रय मुंजाळ, संजय तोरणे, बाळू पवार, किरण ठोंबरे, सोमनाथ ठोकळ यांच्यासह वाहनधारक, नागरिकांनी केली आहे.

सोमैया महाविद्यालयात जागतिक एड्सदिन साजरा

कोपरगाव (प्रतिनिधी)– स्थानिक कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित के. जे. सोमैया वरिष्ठ महाविद्यालय कोपरगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना रेड रिबन क्लबच्यावतीने आरोग्यविषयक प्रबोधन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी ग्रामीण रुग्णालय, कोपरगाव येथील आरोग्य अधिकारी डॉ. अनिल फुलवर हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी प्राचार्य विजय ठाणगे यांनी जागतिक एड्स दिनाची पार्श्वभूमी नमूद करतानाच विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्य सुरक्षेबरोबरच सामाजिक सुरक्षेत आपली भूमिका नोंदवून आरोग्यविषयक जनजागृती यज्ञात सहभागी होण्याचे आवाहन केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ.अनिल फुलवर यांनी एड्स या आजाराबद्दल मार्गदर्शन करताना या संसर्गाचे कारण व उपाययोजना यावर सखोल विचार मांडले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. एस. गायकवाड यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमांचा उद्देश नमूद करताना राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग आरोग्यविषयक जनजागृती शिबिरात सतत सहभाग नोंदवित असल्याचे सांगितले. यासाठी महाविद्यालयातील रेड रिबन क्लब कार्यरत असल्याचाही उल्लेख त्यांनी केला. कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय दवंगे यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

कृषी महाविद्यालयात कृषी शिक्षण दिन उत्साहात

सोनई (वार्ताहर)– मुळा एज्युकेशनच्या कृषी महाविद्यालय, सोनई येथे भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीनिमित्त कृषी शिक्षण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरि मोरे होते. तर व्यासपीठावर विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप तांबे, डॉ. अविनाश काकडे, प्रा.सचिन गायकवाड, प्रा.प्रियदर्शनी जाधव, प्रा.प्रविण इंगोले यांच्यासह इतर सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ.अविनाश काकडे यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. संदीप तांबे यांनी अध्यक्षांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्षांच्या हस्ते डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रतीक्षा शिंदे, राजकुमार प्रणित, स्वाती सतीशकुमार, मनीष चव्हाण, अंकिता देशमुख, हर्षदा ससाणे, भक्ती चव्हाण या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. हरि मोरे म्हणाले, डॉ. राजेंद्र प्रसाद राष्ट्रपतीपदी विराजमान असताना कृषी क्षेत्रातील नवनवीन संशोधनासाठी प्रोत्साहन दिले. कर्तव्यनिष्ठ नेता, शेतीतज्ञ, चांगले वकील, संशोधक म्हणून त्यांची ख्याती होती. कृषिमंत्री असताना शेती क्षेत्राला त्यांनी प्रथम प्राधान्य दिले. प्रदूषित झालेली पाणी, जमीन, हवा यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने कार्यक्षम करून, शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी आजच्या युवकांनी पुढे येणे गरजेचे आहे, कारण विकसित भारतासाठी प्रशिक्षित युवकच देशाला कृषी क्षेत्रात उच्च पातळीवर नेऊ शकतो. सानिका शिंदे व नंदिनी रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले तर ऋषिकेश वाघोले यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.